


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ४३, गुरुवार २ जानेवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेरच्या पाण्यासाठी मुंबईत बैठक घेणार

## ■ सुजित पाटील यांना मंत्री राधाकृष्ण विखे यांची ग्वाही
## ■ एक टीएमसी पाण्यासाठी सुजित पाटील आक्रमक

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याच्या हक्काच्या एक टीएमसी पाण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील हे आक्रमक झाले असून नव्या वर्षाच्या पर्वावर त्यांनी लोणी प्रवरा येथे जलसंपदा मंत्री राधाकष्ण विखे यांची भेट घेत पाणी प्रश्नावर चर्चा केली. आपल्या मागणीचे निवेदन झावरे पाटील यांनी मंत्री विखे यांना सादर केले असून या प्रश्नावर मुंबई तसेच पारनेरमध्ये वरीष्ठ अधिका-यांची बैठक घेण्याची ग्वाही मंत्री विखे यांनी यावेळी दिली.**

कुकडी प्रकल्पाची निर्मिती करताना झालेल्या करारानुसार पारनेर तालुक्याला हक्काचे एक टीएमसी पाणी देण्यात येणार आहे. या प्रश्नावर गेल्या पंधारा वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. मात्र ही मागणी आजवर कागदारवरच राहीली असून पारनेर तसेच नगर तालुक्यातील शेतक-यांना आजही दुष्काळाशी सामना करावा लागतो आहे. पारनेर तालुक्याच्या पठार भागाला एक टीएमसी पाणी मिळाल्यास या भागातील शेती आणि शेतकरी समृध्द होणार आहे. असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.



■ नव्या वर्षाच्या पर्वाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच पारनेरच्या पाण्याबाबत आग्रही मागणी केली.

### कालव्यांवरील पुलास मंजुरी द्या

कालव्यावर पुलाची व्यवस्था नसल्याने दळणवळणाची मोठी अडचण निर्माण होत आहे. अनेक किलोमिटर अंतरावरून माल तसेच प्रवाशांची वाहतूक करावी लागते. नागरीकांच्या सोईसाठी आवष्यक तिथे पुल बांधण्यासाठी मंजुरी देण्याची मागणीही सुजित झावरे यांनी केली.

### विखे यांच्या मंत्रीपदाचा तालुक्याला फायदा

मंत्री राधाकृष्ण विखे यांनी गेली अनेक वर्षे राज्याच्या मंत्रीमंडळात काम केलेले आहे. त्यांच्याकडे मोठा अनुभव असून जल क्षेत्रातही त्यांचा गाढा अभ्यास आहे. योगायोगाने त्यांच्याकडे जलसंपदा खात्याची जबाबदारी आली असून त्याचा फायदा दुष्काळी पारनेर तालुक्याला निश्चित होणार आहे.

सुजित झावरे पाटील
मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद नगर

### उपचाऱ्यांची गळती थांबवा

कुकडी कालव्याबरोबरच पिंपळगांव जोगा कालव्यामार्फत देण्यात येणाऱ्या पाण्यातही पारनेर तालुक्यावर नेहमीच अन्याय होत असल्याचेही झावरे पाटील यांनी मंत्री विखे यांच्या निदर्शना आणून दिले. या कालव्यांच्या उपचाऱ्यांना गळती लागलेली असून त्यातून मोठया प्रमाणावर पाण्याची गळती होऊन पाण्याचा अपव्यय होतो ही बाबही सुजित पाटील यांनी मंत्री विखे यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर योग्य ती कार्यवाही करू अशी ग्वाही मंत्री विखे यांनी दिली.

### अनेक वर्षांचे स्वप्न दृष्टीपथात

पारनेर तालुक्याच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ कायमस्वरूपी हद्दपार करण्याचे स्वप्न मा. केंद्रीय मंत्री स्व. बाळासाहेब विखे तसेच मा. आ. स्व. वसंतदादा पाटील यांनी पाहिले होते. स्व. बाळासाहेब विखे यांनी पाणी परीषदेच्या माध्यमातून त्यासाठी मोठे काम केले. घाटमाथ्यावर पडणारे पाणी वळवून दुष्काळी भागासाठी देण्यासाठी ते आग्रही होते. स्व. वसंतराव झावरे यांनीही पाणी आडविण्याच्या कामांना प्राधान्य देत शेती समृध्द करण्यासाठी प्राधान्य दिले. योगायोगाने स्व. बाळासाहेब विखे यांचे सुपूत्र राधाकृष्ण विखे यांच्याकडे जलसंपदा विभागाची जबाबदारी आली असून स्व. बाळासाहेब विखे यांचे स्वप्न पुर्ण करण्याची संधी त्यांनी मिळाली असून पारनेर तालुक्याचे अनेक वर्षांचे स्वप्न दृष्टीपथात आले आहे.

सुजित झावरे पाटील
मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद नगर

# वाल्मिक कराडला अटक, आता मोठे मासे सापडतील

## मनोज जरांगे यांचा विश्वास | धनंजय मुंडे यांचा संबंध आहे की नाही हे चौकशीत स्पष्ट होईल

आंतरवाली सराटी : प्रतिनिधी

**सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करा, या मागणीसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज जलसमाधी आंदोलन केले. तर दुसरीकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनीही फरार आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे. वाल्मिक कराडला अटक झाली आहे, आता मोठे मासे सापडतील, असा विश्वास मनोज जरांगे यांनी व्यक्त केला. ते आज माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांच्याबाबतही भाष्य केले.**



बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मिक कराड मंगळवारी दुपारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. मात्र, तीन आरोपी अद्यापही फरार आहेत. यावरून मस्साजोगचे ग्रामस्थ आणि मनोज जरांगे आक्रमक झाले आहे. आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज सामूहिक जलसमाधी आंदोलन केले. तर दुसरीकडे मनोज जरांगे यांनीही आरोपींना अटक करण्याची मागणी लावून धरली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अजूनही मुख्य आरोपी फरार आहेत. सर्व आरोपींना अटक होऊन न्याय मिळावा अशी आमची इच्छा आहे. वाल्मिक कराड याला अटक झाली आहे. आता मोठे मासे सापडतील. या प्रकरणात पोलिस कुणालाही सोडणार नाहीत. आरोपींना अटक नाही झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

यावेळी मनोज जरांगे यांना धनंजय मुंडे यांच्याबाबत प्रश्न विचारला असता, चौकशी सुरु आहे. संबंध आहे की नाही, हे सिद्ध होईलच. यामध्ये जे जे येतील त्यांना सुट्टी दिली, तर महाराष्ट्र बंद पाडणार, असेही ते म्हणाले.

### मराठा आरक्षणासाठी २५ जानेवारीपासून आमरण उपोषण

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा आरक्षणावरही भाष्य केले. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे मराठा आरक्षणाविषयी येणाऱ्या २५ तारखेपर्यंत काय निर्णय घेतात, याकडे आमचे लक्ष लागले आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी २५ जानेवारीपासून आम्ही आमरण उपोषण करणार आहे. याआधीही सरकारमध्ये हेच लोक होते, आता फक्त खांदे बदलले आहेत, असे ते म्हणाले.

# वाल्मिक कराडची प्रकृती खालावली!

## ■ रात्री तात्पुरता ऑक्सिजन लावला
## ■ १४ दिवसांची पोलीस कोठडी

बीड : प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा ठपका असलेला वाल्मिक कराड याने काल पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले आहे. त्याला सीआयडीच्या १४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी कराडवर गंभीर आरोप होत असून पवनचक्की प्रकल्पात दोन कोटींच्या खंडणी मागितल्याच्या प्रकरणात कराड मुख्य आरोपी आहे. वाल्मिक कराडच्या मुसक्या आवळण्यासाठी दबाव असतानाच तो सीआयडीला शरण आला आहे. त्यानंतर त्याची तब्येत काहीशी खालावल्याचे दिसून आले.**

बीड मधील संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचा ठपका ठेवण्यात आलेला वाल्मिक कराड काल पुण्यात सीआयडीसमोर शरण आला. त्यानंतर वाल्मिक कराडची काल रात्री वैद्यकीय पथकाने तपासणी



केली, त्यांनी रात्री जेवण केले नसून फक्त अर्धी पोळी खाल्ली असल्याची माहिती आहे. शिवाय वाल्मिक कराड यानी सकाळी नाष्टा केला नाही, दरम्यान कराडला शुगर आहे. त्याचबरोबर त्याला रात्री श्वास घ्यायला त्रास झाल्यामुळे त्याला तात्पुरता ऑक्सिजन लावला गेला, सध्या वाल्मिक कराडची सीआयडी चौकशी सुरू आहे.

काल रात्री सीआयडीने वाल्मीक कराडला अटक केल्यानंतर त्याला कोठडी मिळाल्यानंतर बीड मधील जेलमध्ये ठेवण्यात आले. वाल्मिक कराडला रात्री श्वास घ्यायला त्रास होत असल्याचा त्याने उर्वरीत पान ३ वर

# अजित आणि शरद पवार पुन्हा एकत्र येऊ दे!

## अजितदादांच्या मातोश्रींचे पंढरपूरच्या पांडुरंगाला साकडे | कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित

पंढरपूर : प्रतिनिधी

**अजितला नवीन वर्षातच सुख समृद्धी लाभू दे, तसेच अजित पवार आणि शरद पवार पुन्हा एकदा एकत्रित यावे यासाठी आपण पंढरपूरच्या पांडुरंगाला साकडे घातला असल्याची माहिती अजित पवार यांच्या मातोश्री आशा पवार यांनी दिली. नवीन वर्षानिमित्त आशा पवार यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. कुटुंबातील सर्व वाद मिटून पुन्हा पवार कुटुंब एकत्रित गुणा गोविंदाने नांदू दे, असे साकडे आपण पांडुरंगाला घातले**



**असल्याचे आशा पवार यांनी म्हटले आहे.**

शरद पवार यांचे नातू आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या आईने देखील काही दिवसांपूर्वी पवार कुटुंबातील वाद मिटण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. कुटुंबातील मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र राहणे ही काळाची गरज असल्याचे रोहित पवार यांच्या आईने म्हटले होते. त्यानंतर आता अजित पवार यांच्या आईने देखील पांडुरंगाच्या चरणी पवार कुटुंबाने एकत्र राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

अजित पवार आणि उर्वरीत पान ३ वर

# कोरेगाव भीमा येथे लोटला भीमसागर!

## शौर्य दिनी विजयस्तंभाला अभिवादन



कोरेगाव भीमा : प्रतिनिधी

**कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळपासूनच अनुयायांची गर्दी झाली होती. राज्यातील वेगवेगळ्या भागांतून अनुयायी पेरणे फाटा येथे दाखल होऊन विजयस्तंभाला मानवंदना दिली.**

दरम्यान, अनुयायांची वाढती संख्या लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. 'विजयस्तंभ सुविधा' हे ॲप विकसित करण्यात आले आहे. तसेच, अनुचित घटना टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी असे दोन दिवस देश आणि राज्यभरातून लाखो अनुयायी येत असतात.

गेल्या काही वर्षांपासून अनुयायांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून, यंदा दहा लाख अनुयायी येणार असल्याचा अंदाज सामाजिक संघटनांकडून व्यक्त करण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून अनुयायांसाठी मोफत बससेवा, आरोग्य सेवा, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, ज्येष्ठांसाठी निवारा कक्ष, शौचालय सुविधा, निवारा कक्ष, पिण्याचे पाणी, उर्वरीत पान ३ वर






फॅशन | संसार | सौंदर्य
सखी



# कोणत्या महिलांना असतो प्रीमॅच्युअर डिलिव्हरीचा धोका?

**गरोदरपणातील स्त्रीची सगळ्यात मोठी भीती म्हणजे तिला वाटत असते की आपली प्रीमॅच्युअर डिलिव्हरी तर होणार नाही ना? प्रीमॅच्युअर डिलिव्हरी म्हणजे मुदतपूर्व डिलिव्हरी होय. सामान्यतः स्त्रीची डिलिव्हरी ही ९ महिन्यांमध्ये होते. मात्र अनेक स्त्रिया अशा असतात ज्यांची काही शारीरिक समस्यांमुळे डिलिव्हरी ही ९ महिन्यांआधीच होते. या स्थितीमध्ये बाळाची शारीरिक स्थिती गंभीर असण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि म्हणूनच कोणत्याही स्त्रीला प्रीमॅच्युअर डिलिव्हरीचा धोका वाटता असतो.**

## प्रीमॅच्युअर डिलिव्हरी म्हणजे काय ?

प्रीमॅच्युअर डिलिव्हरी ही गोष्ट गरोदरपणाशी संबधित असते. सामान्यतः गरोदर स्त्री ९ महिन्यांनंतर बाळाला जन्म देते, पण काही स्त्रिया या ९ महिन्यांआधी किंवा ३७ व्या आठवड्याआधीच बाळाला जन्म देतात. याच स्थितीला प्रीमॅच्युअर डिलिव्हरी असे म्हणतात. डिलिव्हरी डेटच्या ३ आठवड्याआधी प्रसुती झाली तर त्याला सुद्धा प्रीमॅच्युअर डिलिव्हरी असेच म्हणतात. यात एक गोष्ट महत्त्वाची म्हणजे ज्या महिलांना प्रीमॅच्युअर डिलिव्हरी होणार आहे त्याची लक्षणे आधीच दिसू लागतात आणि त्यामागे काही कारणे सुद्धा आहेत.

## प्रीमॅच्युअर डिलिव्हरीची लक्षणे

जेव्हा डिलिव्हरी डेटच्या आधी स्त्रीच्या शरीरातली पिशवी फाटते तेव्हा ते सगळ्यात पहिलं आणि खात्रीशीर लक्षण असतं की त्या स्त्रीला प्रीमॅच्युअर लेबरचा धोका आहे. हे लक्षण दिसल्यास योनीतून मोठ्या प्रमाणावर पाणी निघू लागतं आणि अशावेळी स्त्रीला आपत्कालीन वैद्यकीय सहायतेची गरज भासू शकते. प्रीमॅच्युअर डिलिव्हरीच्या अन्य लक्षणामध्ये वजाइनल डिस्चार्ज जास्त होणे, वजाइनल डिस्चार्जच्या प्रकारात बदल दिसणे, पोट आणि पेल्विकच्या भागात दाबसदृश्य स्थिती वाटणे, वारंवार पोटात दुखू लागणे यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. या शिवाय कमरेत वेदना होणे, पोटाच्या खालच्या भागात दुखू लागणे यांसारख्या त्रासामुळे पोटात गॅस झाल्यासारखे सुद्धा वाटते. सोबतच ताप, मळमळ, उलटी यांसारखी लक्षणे दिसल्यास समजून जावे कि त्या गरोदर स्त्रीचे प्रीमॅच्युअर डिलिव्हरी होणार आहे.

## प्रीमॅच्युअर डिलिव्हरीची कारणे

प्रीमॅच्युअर लेबरची अनेक कारणे सुद्धा आहेत. ज्यामुळे गरोदर स्त्रीला या स्थितीला सामोरे जावे लागते. प्रसुतीच्या आधी केलेल्या काही गोष्टीच प्रीमॅच्युअर लेबरला कारणीभूत ठरतात. त्यापैकी काही प्रमुख कारणे आम्ही तुम्हाला सांगतो आहोत. पहिली प्रीमॅच्युअर डिलिव्हरी झाली असली तर पुन्हा ही स्थिती उद्भवू शकते. गर्भामध्ये जुळे किंवा त्यापेक्षा अर्भके असणे, पहिल्या मुलाच्या ६ ते ७ महिन्यांनंतर लगेच दुसरी गर्भधारणा होणे, धुम्रपान, मद्यपान आणि गायनेकोलोजिस्टच्या सल्ल्याशिवाय औषधे घेतल्याने सुद्धा प्रीमॅच्युअर डिलिव्हरी होऊ शकते. गरोदर स्त्रीचे वजन जास्त वाढणे देखील यामागचे महत्त्वपूर्ण कारण आहे. उच्च रक्त दाब आणि मधुमेहासारख्या समस्या सुद्धा प्रीमॅच्युअर लेबरला कारणीभूत ठरतात.

## प्रीमॅच्युअर डिलिव्हरीवर उपचार

जेव्हा प्रीमॅच्युअर डिलिव्हरीची लक्षणे दिसतात तेव्हा लगेच गरोदर स्त्रीला हॉस्पिटलमध्ये मॉनिटरिंगसाठी दाखल करावे. ज्या प्रकरणात नॉर्मल डिलिव्हरी करण्यात समस्या असते, त्यावेळी सिजेरियन ऑपरेशन केलं जातं. जर प्रीमॅच्युअर डिलिव्हरीमुळे बाळाला नुकसान होण्याची शक्यता वाटली तर गरोदर स्त्रीला औषधे दिली जातात. प्रसुतीमध्ये उशीर होण्यासाठी गरोदर स्त्रीला टोकोलिटिक्स किंवा मॅग्नीशियम सल्फेट दिलं जातं. यामुळे प्रीमॅच्युअर डिलिव्हरी काही प्रमाणात पुढे ढकलली जाऊ शकते. मात्र हा उपाय प्रत्येक स्त्रीच्या शारीरिक स्थितीनुसार काम करतो.

## प्रीमॅच्युअर डिलिव्हरी कशी रोखावी ?

स्त्री स्वतः काही प्रमाणात काळजी घेऊन प्रीमॅच्युअर डिलिव्हरी रोखू शकते. जसे की गरोदरपणाचा काळ सुरू झाला की कोणत्याही प्रकारचे संक्रमण होणार नाही याची सर्वप्रथम काळजी घ्यावी. अतिशय जास्त प्रमाणात स्वच्छता राखावी. सतत साबणाने हात धुवावेत. कमी शिजलेले मांस वा मच्छी अजिबातच खाऊ नये. सेक्स करताना कंडोमचा वापर आवर्जून करावा. शक्य तितका कमी ताण घ्यावा. कारण प्रीमॅच्युअर डिलिव्हरी होणाऱ्या स्त्रियांमध्ये ताण तणावाचे प्रमाण सर्वाधिक आढळले आहे.



# थंडीत प्रेग्नेंट महिलांनी काय काळजी घ्यावी?

**गरोदरपणाचा काळ हा स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचा काळ असतो. पण डिलिव्हरीसाठी नेमका उत्तम काळ कोणता याचे उत्तर मात्र बऱ्याच स्त्रियांना माहित नसते. कोणी म्हणतं उन्हाळा चांगला, कोणी म्हणतं पावसाळा चांगला, तर कोणी म्हणतं हिवाळा. पण हे मात्र खरं आहे की यापैकी कोणता तरी एकच ऋतू चांगला असतो आणि तो ऋतू म्हणजे हिवाळा होय. हो मंडळी डिलिव्हरीसाठी हिवाळा हा अतिशय चांगला काळ मानला जातो.**

- क्रीम आणि लोशन लावावे : थंड आणि सुकी हवा यामुळे त्वचा आपले नैसर्गिक मॉइश्चर आणि त्यातील तेल हरवून बसते. पोट वाढल्यावर सुद्धा त्वचेला तडे द्यायला सुरुवात होते. यामुळे अनेक स्त्रियांना वेदना देखील होतात. याच कारणामुळे गरोदर स्त्रियांच्या पोटावर जास्त स्ट्रेच मार्क्स येतात. या पासून त्वचेचा बचाव करायचा असेल तर गरोदर स्त्रीने त्वचेवर क्रीम व लोशन वेळोवेळी लावत राहावे. यामुळे स्कीन हायड्रेट राहते. अनेक स्त्रियांना या साध्या गोष्टीबद्दल माहित नसते. म्हणून तुमच्या आसपास कोणी गरोदर स्त्री असेल तर आवर्जून तिला ही टीप द्या.
- थंडीत सुद्धा पाणी प्या : जास्त पाणी प्यायल्याने जास्त लघुशंका होते आणि हिवाळ्यात वारंवार झोपमोड करून लघुशंकेला जायला लोकांना कंटाळा येतो. खास करून गरोदर स्त्रीसाठी ही गोष्ट जास्त त्रासदायक ठरू शकते. त्यामुळे हिवाळ्यात गरोदर स्त्रिया कमी पाणी पितात. मात्र ही एक मोठी चूक ठरू शकते. गरोदरपणात शरीराला जास्त पाणी लागते. जर गरोदरपणात डिहायड्रेशन झाले तर बाळासाठी आवश्यक असणारे एम्निओटिक फ्लूइड कमी होऊ शकते. यामुळे मुदतपूर्व डिलिव्हरीचा धोका उद्भवतो. तसेच डिलिव्हरीनंतर दूध सुद्धा कमी होऊ शकते. म्हणून गरोदर स्त्रीने हिवाळ्यात जास्तीत जास्त पाणी प्यावे. पाण्यासोबतच फळ आणि भाज्यांचा ज्यूस सुद्धा प्या.
- पाय गरम ठेवा : थंडीत शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रियेवर प्रभाव पडू शकतो. यामुळे त्वचेतील छोट्या छोट्या रक्त वाहिन्यांमध्ये सूज निर्माण होऊ शकते. याशिवाय हात आणि पायांवर खाज लाल चट्टे, सूज व पुळ्या देखील येऊ शकतात. यापासून बचाव करण्यासाठी आपल्या पायांना चांगल्या प्रकारे झाकून ठेवा. कोमट पाण्यामध्ये पाय टाकून बसल्याने पायांना आराम मिळतो. हिवाळ्यात गरोदरपणा आल्यावर पायांचा त्रास अनेक स्त्रियांना जाणवतो. त्यामुळे आवर्जून या साध्या सोप्या उपायाचा वापर प्रत्येक स्त्रीने केला पाहिजे.
- फ्लू वॅक्सीन लावून घ्या : गरोदरपणात फ्लू शॉट लावून घेतल्याने आई व बाळ दोघांना फ्लूपासून सुरक्षा मिळते. जाणकारांच्या मते फ्लू शॉट घेतल्याने तुम्ही तुमच्या बाळाला जन्मानंतर ६ महिन्यांपर्यंत फ्लू होण्यापासून वाचवू शकता. फ्लू वॅक्सीनमुळे गरोदर स्त्रियांमध्ये एक्यूट रेस्पिरेट्री इंफेक्शनचा धोका कमी होतो. ही टिप्स प्रत्येक गरोदर स्त्रीसाठी महत्त्वाची असून डॉक्टरांच्या सल्ल्याने प्रत्येक गरोदर स्त्रीने फ्लू वॅक्सीन लावून घेतले पाहिजे. जेणेकरून बाळ व आई दोघेही सुरक्षित राहतील.
- काय खावे? : गरोदरपणात तुम्ही संतुलित आहार घ्यायला हवा. ज्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या फळांचा समावेश असायला हवा. फळे आपल्या रोगप्रतिकार शक्तीला मजबूत ठेवण्याचे काम करतात. आवळ्यामध्ये रोगप्रतिकार शक्ती अधिक सक्षम करणारे व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. आवळ्याचा ज्यूस हा मॉर्निंग सिकनेस, मळमळ, अपचन आणि गरोदरपणातील अन्य त्रासदायक समस्यांना कमी करण्यात मदत करू शकतो. तुम्ही पालक, मेथी आणि कांद्याच्या पातीसारख्या भाज्यांचा सुद्धा आहारात समावेश करू शकता. गरोदर असाल तर अशा या उपयुक्त टिप्स नक्की वापरा.



# नॉर्मल डिलिव्हरी हवीय?

**गर्भावस्थेचा नववा महिना इतर महिन्यांपेक्षा खूप खास व वेगळा असतो. कारण या महिन्यात काहीच दिवस बाकी असतात बाळाला आयुष्यात येण्यासाठी व घर आनंदाने न्हावून निघण्यासाठी! शिवाय प्रत्येक स्त्रीला आपली डिलिव्हरी अगदी सहज व कोणत्याही वेदनेशिवाय व्हावी असं वाटत असतं. सिझेरियन डिलिव्हरीमध्ये शस्त्रक्रिया करावी लागते पण नॉर्मल डिलिव्हरीमध्ये मात्र त्यामानाने शारीरिक त्रास कमी असतो. म्हणून प्रत्येक महिलेला आपली नॉर्मल डिलिव्हरी व्हावी असं वाटतं. यासाठी न जाणो त्या काय काय उपाय आणि प्रयत्न करतात. पण योग्य माहिती घेऊन प्रयत्न केल्यास त्यास यश येऊ शकतं. जर तुम्हालाही वाटत असेल की, आपली नॉर्मल डिलिव्हरी व्हावी तर प्रेग्नेंसीच्या नवव्या महिन्यात या काही पदार्थांचा आपल्या आहारात समावेश करा. जाणून घेऊया त्या पदार्थांची माहिती...**

- नवव्या महिन्यातील डाएट : गर्भावस्थेच्या नवव्या महिन्यात गर्भातील बाळाचा जवळ जवळ पूर्ण विकास झालेला असतो व त्याचं वजनदेखील वाढलेलं असतं. या काळात तुम्हाला पचनाशी निगडीत समस्या भेडसावू शकतात. जसं की अपचन व ॲसिडीटी इत्यादी! त्यामुळे या काळात तुम्हाला काही पोषक तत्व असलेल्या पदार्थांचा समावेश करणं आवश्यक असतं. आज आम्ही सांगणार आहोत असे काही पदार्थ जे पोषक तत्वांनी भरलेले असतात व नॉर्मल डिलिव्हरीची शक्यता वाढवतात.
- हळद : हळदीमध्ये वेदनाशामक गुणधर्म असतात आणि नवव्या महिन्यात स्त्रियांना कॉन्ट्रेक्शनची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे आपल्या आहारात हळदीचा समावेश नक्की करा. या काळात पेल्विक भागात, कमरेत आणि नितंबामध्ये होणाऱ्या वेदना कमी करण्यास हळद लाभदायक ठरते. रात्री दुधात हळद मिसळून प्यायल्याने भरपूर लाभ मिळतात. तसंच हळदीमधील एंटीलिपिडेमिक गुणधर्म कोलेस्ट्रॉल वाढण्यापासून मज्जाव करतात. यामधील करक्यूमिन नामक तत्व प्रेग्नेंच स्त्री आणि बाळाला अनेक संक्रमण व आजारांपासून वाचवते. प्रेग्नेंसीमध्ये अनेकदा नीट झोप येत नसल्याची स्त्रीयांची तक्रार असते पण कोमट हळदीच्या दुधाने झोप चांगली लागते.
- आलं आणि लसूण : नवव्या महिन्यात प्रेग्नेंस महिलांना आलं व लसूण देखील खाल्लं पाहिजे. आलं चेचून चहात घाला किंवा आलं पाण्यात घालून ते उकळा व उकळलेलं पाणी कोमट करुन प्या. दररोज सकाळी उपाशी पोटी लसणाच्या पाकळ्या खाल्ल्याने शंभर आजार शरीरापासून दूर राहतात. तसंच यामुळे सर्विक्स उघडण्यामध्ये देखील मदत मिळते. तुम्ही जेवणामध्ये देखील लसणाचा वापर करू शकता. लसूण गर्भावस्थेतील थकवा दूर करण्यास लाभदायक ठरते. आलं-लसणाचं सेवन केल्याने चक्कर व उलटीच्या समस्येपासूनही मुक्ती मिळते.
- ओव्याचे लाडू व कोमट पाणी : ओव्याचा गुणधर्म उष्ण असतो आणि ओवा नॉर्मल डिलिव्हरीसाठी मदत करतो. तुम्ही प्रेग्नेंसी मध्येच नाही तर डिलिव्हरीनंतर देखील हे लाडू खाऊ शकता. यामुळे शरीराला ताकद मिळते. तसंच प्रेग्नेंसीदरम्यान भरपूर पाणी प्यायलं पाहिजे व कोमट पाणी तर या काळात खूपच लाभदायक असतं. यामुळे स्नायूंमधील तणाव कमी होतो. थंड पाणी किंवा थंड पदार्थ खाल्ल्याने स्नायू संकुचन पाऊ शकतात. स्नायू आखडल्यामुळे डिलिव्हरीवेळी समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे गर्भावस्थे दरम्यान गरम पदार्थ खाणं उत्तम पर्याय आहे.



- खजूर व दूध-तूप : दूध गरम करून त्यात खजूर घाला. दूध उकळल्यानंतर प्या. तुम्हाला हवे असल्यास गरम दुधासोबतही खजूराचे सेवन करू शकता. असं म्हटलं जातं की, नवव्या महिन्यात दूधात साजूक तूप घालून प्यायल्याने गर्भाशय व योनी चिकट म्हणजेच मुलायम होते. ज्यामुळे नॉर्मल डिलिव्हरी होण्यास मदत मिळते. पण दूधात साजूक तूप घालून प्यायल्याने वजन जास्त वाढतं, त्यामुळे जर तुमचं वजन आधीपासूनच जास्त असेल तर तूपाचे सेवन कमी करा. चीज, कॉफी, दारू, अपाश्चरायझ दूध या पदार्थांचे सेवन या काळात कटाक्षाने टाळले पाहिजे.

# प्रेग्नेंसीमध्ये घ्या हेल्दी अन् एनर्जी ड्रिंक्स!

**गर्भवती स्त्रीच्या शरीरात पाण्याची कमतरता झाली नाही पाहिजे. कारण यामुळे आई किंवा बाळाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत तुम्हाला पाणी प्यायला आवडत नसेल तर विविध प्रकारच्या द्रव्य पदार्थांनी तुम्ही शरीर हायड्रेटेड ठेऊ शकता.**

गरोदरपणा हा स्त्रीसाठी अत्यंत कष्टदायक काळ असतो. या काळात शरीरावर दुसऱ्या जीवाचा भार घेऊन जगायला लागते. त्यामुळे साहजिकच शरीरातील ऊर्जा झपाट्याने कमी होते आणि ही ऊर्जा भरून काढण्यासाठी शरीराला पोषणाची गरज असते. शरीरात ऊर्जा नसेल तर शारीरिक समस्या अजून वाढतात. थकवा जाणवू लागतो. चक्कर येते. जीव कासावीस होतो आणि ही स्थिती अजिबातच गरोदर स्त्रीसाठी व तिच्या बाळासाठी चांगली नाही. अशा या कमकुवत शरीराला पुन्हा एनर्जी देण्यासाठीचा सर्वात सोपा मार्ग आहे पाणी पिणे वा हेल्दी ड्रिंक्स घेणे. अशा प्रकारच्या द्रव पोषणाचा शरीराला फायदा होतो आणि शरीरातील संपलेली ऊर्जा पुन्हा जिवंत होऊ लागते. म्हणूनच सल्ला दिला जातो की गरोदर स्त्रीने शक्य तितकं जास्त द्रव प्यायला हवं.



- लिंबू पाणी : लिंबू पाणी शरीराला हायड्रेट ठेवते आणि कमी झालेल्या इलेक्ट्रॉलला पूर्ण करते. यात व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. जे शरीरात लाल पेशी बनवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोहाच्या अवशोषणात मदत करते. लिंबू पाणी मॉर्निंग सिकनेसला सुद्धा दूर करते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लिंबू पाणी रक्तदाबाला देखील नियंत्रित करते. त्यामुळे गरोदर स्त्री ने जास्तीत जास्त प्रमाणात लिंबू पाणी प्यायला हवे.
- नारळ पाणी : नारळ पाण्यात इलेक्ट्रॉलाईट्स, पॉटेशियम, क्लोराईड आणि मॅग्नेशियम मोठ्या प्रमाणावर आढळते. सोबतच यात कॅल्शिअम, डायट्री फायबर, रायबोफ्लेविन आणि व्हिटॅमिन सी देखील असते. हे सर्व घटक शरीराला मोठ्या प्रमाणावर पोषण देतात आणि हायड्रेटेड ठेवतात. त्यामुळे गरोदर स्त्रीने आठवड्यातून २-३ वेळा तरी नारळ पाण्याचे सेवन करायलाच हवे. जाणकार सुद्धा आवर्जून नारळ पाणी पिण्याचा सल्ला गरोदर स्त्रीला देतात.
- ताक : ताक हे अनेकांचे आवडते पेय. जेवण झाले की ताक पिण्याची सवय खूप जणांना असते. असे हे ताक गरोदर स्त्रीसाठी सुद्धा एक चांगला पोषण पर्याय मानले जाते. यात कॅल्शियम मोठ्या प्रमाणावर आढळते. उन्हाळ्याच्या काळात गरोदर स्त्रीने न चुकता ताक प्यायला हवे, कारण ताक हे उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते आणि पाण्याचे संतुलन कायम राखते. बाहेरचे ताक पिण्यापेक्षा स्त्रीने घरच्या घरी ताक बनवून पिणे उत्तम!
- गाजर ज्यूस : गाजराचा ज्यूस शरीराला केवळ हायड्रेटेडच ठेवत नाही तर शरीराला हव्या असलेल्या अनेक व्हिटॅमिन्सची आणि खनिज पदार्थांची पूर्तता करतो. त्यामुळेच स्त्रीने रोज एक ग्लास गाजराचा ज्यूस प्यायल्यास तिला मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकतो. मात्र गाजर ज्यूसचे सेवन हे मर्यादित प्रमाणातच व्हायला हवे. कारण अति गाजराचे प्रमाण गरोदरपणात चांगले मानले जात नाही.
- व्हेजिटेबल ज्यूस : हा आधुनिक ज्यूस सध्या पूर्ण जगात प्रसिद्ध झाला आहे. यात जास्त प्रमाणात पोषक तत्वे असतात आणि फायबर देखील मोठ्या प्रमाणावर आढळते. मुख्य म्हणजे हा ज्यूस तुम्ही तुमच्या आवडीनुसार तुम्हाला हव्या असलेल्या भाज्या घेऊन बनवू शकता. तुमच्या मनाप्रमाणे यात स्वाद टाकू शकता. तज्ज्ञांच्या मते रोज एक ग्लास व्हेजिटेबल ज्यूस पिण्याने स्त्रीचे आरोग्य उत्तम राहते आणि तिला व बाळाला मोठ्या प्रमाणावर पोषण मिळते.



## शॉर्ट न्यूज

### मार्केटींगसाठी ठेवलेल्या मुलीवर अत्याचार

**नगर :** मार्केटींगचे काम करण्यासाठी ठेवलेल्या अल्पवयीन मुलीसोबत वारंवार शरीर संबंध ठेवले. संबंध करताना फोटो व व्हिडीओ शुटींग काढली व ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने मंगळवारी सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अत्याचार करणाऱ्या संशयितासह त्याच्या पतीविरोधात अत्याचार, पोस्को, अॅट्रॉसिटी आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### हिवरगाव पावसा टोलनाक्यावर चौघांना मारहाण

**संगमनेर :** हिवरगाव पावसा टोलनाक्यावर मध्यरात्रीच्या सुमारास एका अधिकाऱ्यासह १० ते १५ गुंडांनी केलेल्या हाणामारीत भाजपचे शहर उपाध्यक्ष अतुल कासट व त्याचे छोटे बंधु अमित हे दोघे गंभीर जखमी झाले. या दोघांवरही खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वाहनांचा एकमेकांना धक्का लागल्याच्या कारणावरून दोघांमध्ये सुरू असलेल्या वादात अचानक टोल कर्मचाऱ्यांनी लोखंडी रॉड, लाकडी दांडके आणि दगडांचा वापर करून चौघांवर हल्ला केल्याची घटना घडली.

### शेवगाव ग्रामीण रुग्णालयात बोंबाबोंब आंदोलन

**शेवगाव :** रुग्णांना योग्य व पुरेशासुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या प्रमुख मागणीसाठी सोमवारी (दि. ३०) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास शेवगाव ग्रामीण रुग्णालयात वंचित बहुजन आघाडीने बोंबाबोंब आंदोलन केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना धोंडे-बारस्कर यांच्यासमोर वंचितचे किसन चव्हाण यांनी समस्यांचा पाढाच वाचला. सर्व समस्या सोडविण्यात येतील, असे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

### मावा तयार करणाऱ्यांवर पोलिसांचे छापे

**नेवासा :** पोलिसांनी शहरातील जुने कोर्ट गल्ली येथे दोन ठिकाणी छापा टाकून सुगंधी तंबाखू, मावा तयार करून विक्री करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल केला. त्यांच्याकडून ३ लाख १८ हजार ८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. पो. कॉ किशोर शिरसाठ यांनी दिली. छापा टाकून २ लाख ५ हजार ८८० रुपयेचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी जावेद फज्जू शेख सह दोघांवर गुन्हा दाखल केला. दुसरी फिर्याद पो. ना संदीप दरंदले यांनी दिली. रियाज बाबा शेख व सुरेंद्र प्रसाद रा. नोएडा (दिल्ली) याचे ताब्यातून १ लाख १३ हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### विखे यांनी कार्यकर्त्यांची एक पिढी घडविली

**राहाता :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांची एक पिढी घडविली. विचारांच्या आधारावर संघर्ष करण्याचा संस्कारही दिला. यामुळेच विखे पाटील परिवारावर प्रेम करणाऱ्या समर्थक, कार्यकर्त्यांची संख्या कमी झाली नाही. जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी त्यांनी पाहिलेले स्वप्न आता कृतीत उतरण्याची मोठी संधी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्ह्याला मिळाली, अशा शब्दांत जिल्ह्यातील मान्यवरांनी पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांना आदरांजली अर्पण केली.

# महाराष्ट्र केसरी रघुनाथ पवार यांच्या कुस्तीची पन्नाशी!

## पुणे जिल्ह्याला पहिली गदा मिळवून देणारा मल्ल । पुणेकरांनी काढली होती हत्तीवरून हटके मिरवणूक

शिरुर : सतीश डोंगरे

**ते वर्ष होते १९७५ आणि स्पर्धेचे ठिकाण चंद्रपूरचे स्टेडियम... सकाळपासूनच कुस्ती शौकिनांचा महापूर चंद्रपूरच्या स्टेडियमच्या दिशेने पुढे सरकत होता... ही स्पर्धा पुण्याचा पहिला महाराष्ट्र केसरी ठरविणारी होती... बरोबर दुपारी ४ वाजता कुस्ती पुकारण्यात आली... शिरुरचा पैलवान रघुनाथ पवार विरुद्ध कोल्हापूरचा अग्रेल निग्रो हे दोन महाकाय मल्ल एकमेकांशी झुंजू लागले... डाव-प्रतिडाव, डावांच्या उकली करून सर्वांग घामाने भिजून गेले... १२ मिनिटे खडाखडी झाल्यानंतर पवार यांनी अग्रेल यांचा एकेरी पट काढून एक गुण मिळवला... १७ व्या मिनिटाला अग्रेलला खाली घेऊन दुसऱ्या गुणाची कमाई केली, यानंतर झोळी डावावर चितपट कुस्ती करण्याच्या प्रयत्नात असताना वेळ संपली... तोपर्यंत शिरुरचे सुपूत्र असलेल्या पवारांनी महाराष्ट्र केसरीची मानाची पहिली गदा पुण्यात आणण्याचा इतिहास घडविला होता...**

या कुस्तीला यंदा ५० वर्षे पूर्ण होत आहेत. चंद्रपूरला झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत मॅटवर कुस्ती करणाऱ्या रघुनाथ पवार यांनी बाळू पाटील, कलाप्पा पाटील, रामप्रसाद, शिवाजी पाचपुते यांना नमवून अंतिम फेरीत मजल मारल्यानंतर अंतीम लढतीत कोल्हापूरच्या बलदंड अग्रेल निग्रोला अस्मान दाखवित ते पुण्याचे पहिले तर महाराष्ट्राचे १४ वे महाराष्ट्र केसरी ठरले. पुणेकर कुस्ती शौकीनांनी त्यावेळी पवार यांची हत्ती वरुन मिरवणूक काढली होती.




या कुस्तीने त्यावेळी शिरुरचे नाव सर्वदूर पसरले. तत्पूर्वी १९७३ आणि १९७४ अशा दोन वेळा पवारांना महाराष्ट्र केसरीने हुलकावणी दिली होती. त्यावेळी दोन्ही वेळा त्यांना उपमहाराष्ट्र केसरी वर समाधान मानावे लागले होते.

पैलवान रघुनाथ पवार यांचा जन्म २ सप्टेंबर १९४८ चा त्यांचे प्राथमिक शिक्षण तर्डोबाची वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. तेथील तालमीतच सराव व मेहनत करून कुस्तीचे प्राथमिक धडे तिथेच गिरविले. कुस्तीसाठी कठीण अंग मेहनत करत शालेय वयातच त्यांनी गावोगावच्या जत्रेच्या आखाड्यांमधून चमक दिखविली. पुढे शिरुर मधील त्याकाळचे नामांकीत वस्ताद पैलवान दत्तोबा कालेवार यांना पवार यांनी आद्यगुरू मानले त्यांनी पवार यांना कुस्तीचे धडे आणि बारकावे शिकविले. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी म्हणजे १९६५ मध्ये रघुनाथ पवार सैन्यदलात भरती झाले. त्यांचे कुस्तीमधील कौशल्य पाहून तेथेही त्यांना कुस्ती खेळासाठी संधी देण्यात आली. ही आपल्या दृष्टीने एक पर्वणीच होती, असे रघुनाथ पवार सांगतात.

सैन्यदलामध्ये असतांना गांगुलीराम बनारसी हे नामवंत कुस्तीगीर पवारांना प्रशिक्षक म्हणून लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी केली. १९७४ साली न्युझीलंड येथे राष्ट्रकुल क्रिडा कुस्ती स्पर्धा झाल्या. त्यामध्ये रघुनाथ पवार यांनी भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर देशाच्या कुस्ती क्षेत्रात त्यांचे नांव झाले. पुढे वर्षभरातच १९७५ मध्ये त्यांनी मानाच्या महाराष्ट्र केसरी पदावर नाव कोरुन पुणे जिल्ह्याला पहिली गदा मिळवून दिली. शिरुरकरांसाठी सुवर्ण अक्षरात लिहावा असा हा क्षण ठरला. सन १९७६ मध्ये महाराष्ट्र शासनाचा छत्रपती क्रिडा पुरस्कार त्यांना तत्कालीन राज्यपाल अली जंग यांच्या हस्ते बहाल करण्यात आला. याशिवाय शेकडो कुस्त्यांमध्ये पवारांनी मैदाने गाजवली त्यातून छोटी मोठी अनेक पदके प्राप्त केली.

राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या मल्लांचे प्रशिक्षक म्हणूनही पवारांनी काही काळ काम केले. कुस्ती मधील नेत्रदिपक कामगिरी लक्षात घेऊन सैन्यदलात त्यांची कॅप्टन पदावर बढती झाली. पुढे १९९७ मध्ये ते सैन्यदलातून निवृत्त झाले. त्यानंतर शिरूर येथील तालमीमध्ये त्यांनी होतकरू व कुस्तीची आवड असणाऱ्या मेहनती तरूणांना प्रशिक्षण देण्याचे काम केले. अनेक स्पर्धा व आखाड्यांमधून त्यांनी पंच म्हणूनही कामगिरी बजावली. या वयात आजही ते कुस्तीचा वसा आणि वारसा याची सातत्याने जपणूक करीत आहेत.

### महाराष्ट्र केसरीची पन्नाशी... आनंदाचा सुवर्णक्षण !

**मला महाराष्ट्र केसरी किताब मिळाला त्याचे यंदा हे सुवर्णमहोत्सवी वर्षे. काळ कसा सर्रकन पुढे सरकतोय. चंद्रपूरचे भव्य स्टेडीयम...कुस्तीशौकीनांचा जल्लोष... आणि या जल्लोषी वातावरणात माझ्या खांद्यावर सन्मानाने टाकण्यात आलेली महाराष्ट्र केसरीची मानाची गदा लगेच दुसऱ्या दिवशी पुण्यात भव्यदिव्य अशी हत्ती वरुन मिरवणूक. हे सर्व पन्नास वर्षांपूर्वीचे चित्र आज पुन्हा जसेच्या तसे डोळ्यासमोर तरळतेय. एकीकडे ताकद आणि दुसरीकडे डाव यांची सांगड घालून पुढच्या पैलवानाला चीतपट करण्याचा अस्सल भारतीय पध्दतीचा चित्तथरारक खेळ म्हणजे कुस्ती. दणकट शरीर हेच कुस्तीचे भांडवल. याच बळावर समोरच्या पैलवानाला अस्मान दाखवून विजयाची गदा खांद्यावर घेऊन फडात मिरवण्याची लालसा प्रत्येक पैलवानालाच लागलेली असते मात्र त्यासाठी जबरदस्त मेहनत, मजबूत खुराक, चपळता आणि शरीरसंपदा या गोष्टी गरजेच्या आहेत.**

**पैलवान रघुनाथ पवार**
पुणे जिल्ह्याचे पहिले महाराष्ट्र केसरी

---

वाचकांच्या लेखणीतून

# तैलबुध्दी आणि घृतबुध्दी

दिल के किस्से कहां नहीं होते।
हां! वोह सबसे बयां नहीं होते।।

काळजाचे किस्से कुठे नसतात? ते सर्वत्र घडतच असतात. फक्त ते सगळ्यांनाच वर्णन करून सांगता येत नाहीत एवढेच!



उकडलेल्या मक्याच्या कणसाचे दाणे मी खाल्ले होते. दातात काही तरी अडकल्या सारखे वाटत होते. ते सारखे सलत होते. म्हणून मी माझ्या मुलीला ते काढायला सांगितले. तिने ते काढले आणि मला म्हणाली, अण्णा, आता तुमचं तोंड पाण्याने विसळून टाका.

पाण्याने चूळ भरुन टाका किंवा पाण्याने गुळण्या करून टाका असे मुलीला म्हणायचे असावे. त्याऐवजी तोंड पाण्याने विसळून टाका असे ती म्हणाली! भांडे पाण्याने विसळतात. तोंड नाही!

आपल्याला योग्य शब्दाचा योग्य ठिकाणी वापर करता आला पाहिजे. म्हणजे शब्द सार्थ ठरतो आणि अर्थही स्पष्ट होतो.

दोन सुंदर शब्द आहेत. तैलबुध्दी आणि घृतबुध्दी. संस्कृत भाषेतून आपल्या मराठीत ते आले आहेत.

एखादा माणूस तैलबुध्दी आहे. म्हणजे त्याचे ज्ञान व्यापक किंवा विस्तृत आहे. अर्धा थाळाभर पाणी घ्यायचे. त्यात गोडेतेलाचा एक थेंब टाकायचा. तो तेलाचा थेंब एकसारखा म्हणजे वर्तुळाकार थाळ्यात सलग पसरत जातो. म्हणजे तेलाचा तो थेंब थाळ्याएवढ्या आकाराचा होतो. त्यात सलगता असते हे विशेष! म्हणून व्यापक आणि ठाम बुध्दी असलेल्या माणसाला आपण तैलबुध्दी व्यक्ती म्हणतो.

दुसरा शब्द आहे घृतबुध्दी. घृत म्हणजे तूप. अर्धा थाळाभर पाण्यात तुपाचा एक थेंब टाकला तर त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतात. तुपाच्या एका थेंबाचे शेकडो थेंब होऊन ते थाळ्यातल्या पाण्यावर विखुरलेले दिसतात. फाटक्या, ठाम नसलेल्या किंवा अस्थिर बुध्दीच्या माणसाला आपण घृतबुध्दी व्यक्ती असे म्हणतो.

येथे तैलबुध्दी आणि घृतबुध्दी शब्दांचे अर्थ संदर्भासहित तर कळलेच; शिवाय समग्र अर्थही स्पष्ट झाले म्हणण्यास हरकत नाहीं. एखाद्या शब्दाचे सम्यक् किंवा सर्वांग परिपूर्ण ज्ञान होणे म्हणजे विद्वत्तेचा दरवाजा खुलणे होय, असा एक इंग्रजी सुविचार आहे. तो वावगा म्हणता येणार नाही.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

---

# दादा, तुम्ही शिवरायांचे पाईक, हे दाखवून दिले !

**प्राजक्ता माळीने दाखवले मोठे मन**
**सुरेश धसांनी केली होती दिलगिरी व्यक्त**

मुंबई : प्रतिनिधी

**भाजप आमदार सुरेश धस यांनी सोमवारी माध्यमांसमोर येत अभिनेत्री प्राजक्ता माळीची माफी मागितली होती. यानंतर आता प्राजक्ता माळीनेही प्रतिक्रिया देत सुरेश धस यांच्यावर कुठलीही कारवाई करणार नसल्याचे सांगितले. तसेच दादा, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक आहात, हे दाखवून दिले, असे म्हणत प्राजक्ता माळीने सुरेश धस यांचे कौतुक केले. त्यामुळे प्राजक्ता माळी-सुरेश धस यांच्या वादाचा मुद्दा आता संपुष्टात आला आहे.**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीचा उल्लेख करत वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरून प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेत सुरेश धस यांचा समाचार घेतला होता. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महिला आयोगाकडेही तक्रार केली होती. या दरम्यान, सुरेश धस यांनी सोमवारी दिलगिरी व्यक्त करत प्राजक्ता माळीची माफी मागितली.



आमदार सुरेश धस यांचे मनापासून आभार मानते. त्यांनी मोठ्या मनाने समस्त महिला वर्गाची माफी मागितली, दिलगीरी व्यक्त केली. दादा, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक आहात, ही छत्रपतींची भूमी आहे. त्यांचे इथे पुढे चालवले जातील, हे तुम्ही दाखवून दिले, असे प्राजक्ता माळी म्हणाली. तिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आभार मानले. मुख्यमंत्र्यांनी यात जातीने लक्ष घातले आणि अत्यंत संवेदनशीलतेने हा विषय पुढे नेला, मार्गी लावला, असेही ती म्हणाली.

कुठलेही आंदोलन, मोर्चा किंवा मोहीम डायव्हर्ट करण्याचा माझा हेतू नव्हता. माझ्या मार्फत कुणा दुसऱ्याचाही हा हेतू नव्हता, असेही स्पष्ट करते. सुरेश धस माझ्याबाबत बोलले नसते, तर आज मला हे सर्व करायची गरज पडली नसती, असे स्पष्टीकरण प्राजक्ता माळीने दिले आहेत त्यामुळे कुणीही त्यातून गैरअर्थ काढू नये, असे आवाहन प्राजक्ता माळीने केले. आमदार सुरेश धस यांनी माफी मागितल्याने मी त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई करणार नाही. माझ्या बाजूने या संपूर्ण प्रकरणावर पडदा टाकते. आम्ही व्यक्त झालो की आमच्यावर टोळ धाड पडते, असे म्हणत प्राजक्ताने खंतही व्यक्त केली आहे.

---

(पान १ वरून)

### अजित आणि शरद पवार पुन्हा एकत्र येऊ दे!

शरद पवार यांच्यात वाद झाल्यानंतर या दोघांनी पुन्हा एकत्र यावे, अशी इच्छा कार्यकर्ते तसेच पदाधिकारी वारंवार व्यक्त करत आहेत. त्यातच विधानसभा निवडणुकीच्या नंतर अनेकांनी पवार कुटुंबाने एकत्र येण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र या संदर्भात अद्याप शरद पवार किंवा अजित पवार यांनी कोणतेही वक्तव्य केलेले नाही. मात्र आता अजित पवार यांच्या मातोश्री यांनी पांडुरंगाच्या चरणी यासाठी साकडे घातले आहे. त्यामुळे याबाबतची चर्चा अधिकच रंगली आहे.

नेमक्या काय म्हणाल्या आशा पवार
अजित पवार आणि सर्वांनाच नवीन वर्ष चांगले सुखचे राहू दे. तसेच पवार कुटुंबातील सर्व वाद मिटू दे, अशी मागणी आपण पांडुरंगाच्या चरणी केली असल्याचे आशा पवार यांनी म्हटले आहे. याच वर्षात शरद पवार आणि अजित पवार यांनी एकत्र यावे असे वाटते. पांडुरंग माझे गाऱ्हाने नक्की ऐकेल, असा विश्वास देखील आशा पवार यांनी व्यक्त केला.

एकत्र येण्याच्या चर्चा
अजित पवार व शरद पवार यांचे राजकीय मार्ग वेगळे झाले आहेत. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांसह शिंदे - फडवीस सरकारला पाठिंबा दिला होता. त्यानंतर अजित पवार स्वतः उपमुख्यमंत्री झाले, तर त्यांच्या समर्थक ८ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांना चांगले यश मिळाले आहे. दरम्यानच्या काळात शरद पवार आणि अजित पवार यांनी एकमेकांवर तिखट टीका देखील केली. मात्र, शरद पवारांच्या वाढदिवसाशी अजित पवार हे शरद पवारांच्या घरी पोहोचले होते. तेव्हापासून हे दोन्ही नेते पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चा वाढल्या आहेत.

### वाल्मिक कराडची प्रकृती खालावली!

पोलिसांनी सांगितले, त्यानंतर त्याला तात्पुरतं ऑक्सिजन लावण्यात आले अशी माहिती समोर आली आहे. काल रात्री उशिरा डॉक्टरांच्या पथकाने त्याची तपासणी देखील केल्याची माहिती समोर आली आहे, आत्ता गेल्या दोन तासांपासून सीआयडी चौकशी करते आहे, कस्टडीतील पहिल्याच दिवशी वाल्मिक कराडला श्वास घ्यायला त्रास होत असल्याची तक्रार त्यांनी केली होती, डॉक्टरांचे एका पथकाने त्याची तपासणी देखील केली आहे, याची माहिती समोर आली आहे.

**अखेर वाल्मिक कराड शरण!**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सूत्रधार असल्याचा आरोप केलेला वाल्मिक कराड काल पुण्यात सीआयडीसमोर शरण आला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार होता. या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी फरार आहेत. त्यामध्ये वाल्मिक कराड याचेही नाव होते. वाल्मीक कराड याचा शोध सीआयडीकडून घेतला जात होता. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण झालं त्यानंतर त्यांची त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येचे पडसाद राज्यभरात उमटले. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आरोपींना अटक झाली नाही म्हणून गावकऱ्यांनी आणि कुटूंबाने आंदोलने केली. या हत्या प्रकरणाचा लवकरात लवकर तपास करून आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

**कोरेगाव भीमा येथे लोटला भीमसागर!**

पोलीस मदत कक्ष, वाहनतळ आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. या सुविधांचा लाभ सहज घेता यावा आणि सुविधांपर्यंत अनुयायांना लवकरात लवकर पोहोचता यावे, यासाठी जिल्हा परिषदेकडून 'विजयस्तंभ सुविधा' हे अॅप विकसित करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती, वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.या समित्यांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष अधिकारी आणि १७ समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले होते. तसेच, सोहळ्यातील सुरक्षेच्या दृष्टीने आठ हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.पेरणे फाटा परिसरात मोठ्या प्रमाणात अनुयायांनी हातात झेंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेऊन परिसर घोषणांनी दुमदुमून टाकला होता.

# खा. लंके यांनी घेतले महाआरोग्य शिबिरात उपचार!

## स्व.गंगाराम भनगडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाळवणीत शिबिर



शिबिरात ती जखम डॉक्टरांना दाखवत

**भाळवणी : प्रतिनिधी**

**माजी सैनिक तथा सैनिक सहकारी बँकेचे माजी संचालक गंगाराम भनगडे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त भाळवणी येथे आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरात खा. नीलेश लंके यांनी उपचार घेत आपली साधे राहणीमान पुन्हा एकदा अधोरेखीत केले.**

देशाची सेवा करताना युध्दभुमीवर जखमी झालेले माजी सैनिक तथा सैनिक बँकेचे मा. संचालक गंगाराम भनगडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त निवृत्तीमहाराज इंदोरीकर यांच्या किर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. किर्तन सेवेनंतर महाआरोग्य शिबिरास प्रारंभ करण्यात आला. इंडो आयरीश हॉस्पिटलचे संचालक डॉ. जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरात ४७६ रूग्णांची मोफत तपासणी करण्यात येऊन उपचार तसेच औषधांचे वितरण करण्यात आले.

शिबिरास सुरूवात झाल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी भेट दिली. खा. लंके यांच्या पायाला जखम झाल्याने त्यांनी या त्यावर उपचार करण्याची सुचना केली. डॉक्टरांनी तपासणी करून जखमेवर उपचार केले. खा. लंके यांचा हा साधेपणा उपस्थित नागरीकांना चांगलाच भावला.

यावेळी मा. आ. दादाभाऊ कळमकर, जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे, सैनिक बँकेचे चेअरमन शिवाजी व्यवहारे राळेगणसिध्दीचे सरपंच जयसिंग मापारी, कोठारी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संजय कोठारी, बी.एम. डब्लू ग्रुपचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष बापूशेठ माने, डॉ. राजेश भनगडे, बाजार समितीचे सभापती बाबासाहेब तरटे, संभाजी रोहोकले, सरपंच लिलाबाई रोहोकले, विकास रोहोकले, सैनिक बँकेचे संचालक संतोष गंधाडे, बाळासाहेब मते, बाळासाहेब हिलाळ, राजेंद्र जगताप, बाळासाहेब नरसाळे, नीलेश शिंदे, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा सैनिक बँकेचे संचालक कारभारी पोटघन, वकील संघाचे तालुकाध्यक्ष ॲड. मेसे, डॉ. प्रदीप दाते, वंदना गंधाक्ते आदी यावेळी उपस्थित होते. या शिबिरात डोळयांच्या ३८ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. शैलेश लोढा यांनी परीश्रम घेतले. भाळवणी ग्रामिण पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष भनगडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर संतोष रोहोकले यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

### आरोग्य शिबिरे काळाची गरज

**सध्याच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असून नागरीकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी अशा प्रकारच्या आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. अशी आरोग्य शिबिरे आयोजित करून रूग्णांची सेवा करणे हीच गंगाराम भनगडे यांना खरी श्रध्दांजली ठरेल.**

ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर

### सुजित झावरे यांनीही केली तपासणी

**शिबिरास भेट दिल्यानंतर जिल्हा परिषदेचे मा उपाध्यक्ष सुजित झावरे यांनीही डॉक्टरांकडून आपली तपासणी करून घेत डॉक्टरांचा सल्ला घेतला. महाआरोग्य शिबिरांच्या माध्यमातून वंचित घटकांसाठी चांगली सुविधा मिळाल्याचे झावरे म्हणाले.**

# तरूणाईने व्यसनापासून दुर रहावे

## ह.भ.प.माऊली महाराज पठाडे यांचे प्रतिपादन | दैठणे गुंजाळ येथे भक्तिपंढरी सोहळा

**दैठणे गुंजाळ : प्रतिनिधी**

**तरूण पिढीने व्यसनापासून दुर रहण्याचे आवाहन करतानाच गावातील निर्व्यसनी भावी पिढी आयएएस, आयपीएस झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास माऊली महाराज कर्जतकर यांनी व्यक्त केला.**

दैठणे गुंजाळ येथे प्रतिजेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खंडेश्वर मंदिरात भक्तिपंढरीचे आयोजन करण्यात आले असून या दिमाखदार सोहळयामध्ये माऊली महाराज पठाडे यांनी किर्तनसेवा केली.

आई-वडीलांचा मान करणारांचे जगही सन्मान करते असे सांगत माऊली महाराज पठाडे म्हणाले, आज समाजामध्ये आई-वडीलांचे सेवा करेल त्यांचा मान सन्मान राखेल, त्यांचा मान-सन्मान करेल असे पठाडे महाराज म्हणाले. तरूण पिढीने व्यसनापासून दुर राहून पहावे, तुमचा परिवार सुखी समाधानी राहिल. आपल्या आयुष्याचा स्वतःच्या हाताने नाश करून घेऊ नका. या जीवनाचे सार्थक करण्यासाठी आपले चित्त शुध्द ठेवा, एकाग्र मन करू भगवंताचे चिंतन करा, तरूणांनी स्पर्धा परिक्षांसाठी विशेष प्रयत्न करावेत. विविध परीक्षांमध्ये यश संपादन करून गावाचे नाव उज्वल करावे, तुमच्या जीवनाचे, नरदेहाचे सार्थक होईल असा सल्ला पठाडे महाराजांनी दिला.

यावेळी मनिपुरमध्ये जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले अभिजित पठारे, खंडेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव गुंजाळ, सरपंच बंटी गुंजाळ, बापूराव गुंजाळ, सचिन गुंजाळ, मोहन गुंजाळ, आकाश येवले, निखिल भोर, बाबासाहेब पठारे, केतन येवले, अरविंद पठारे, रोहन गुंजाळ, साहेबराव गुंजाळ, सबाजी येवले, संतोष गुंजाळ, जयसिंग गुंजाळ यांच्यासह भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.




### छत्रपतींचा जीवनपट अभिमानास्पद

**छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा विषय आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्राची, त्यांच्या पराक्रमाची, स्वराज्य स्थापन करताना त्यांना आलेल्या अडचणींची प्रत्येकाला माहिती असणे आवष्यक आहे.**

### पाच हजार भाविकांसाठी महाप्रसाद

**भक्तिपंढरीमध्ये महाराष्ट्रातील प्रसिध्द किर्तनकारांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ ते ९ दरम्यान किर्तन सेवा होत असून किर्तन सेवेनंतर दररोज पाच हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.**

# शहाजापुरला वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा

## कौडेश्वर वाचनालयाचा उपक्रम



**सुपा : प्रतिनिधी**

**शहाजापुर येथील कौडेश्वर वाचनालयात वाचन संस्कृती वृध्दींगत व्हावी,नवी पिढी वाचनाकडे वळावी या हेतूने राज्य शासनाच्या वतीने १ ते १५ जानेवारी दरम्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

राज्य शासनाच्या वतीने राज्यभर हा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना पुस्तके आणि वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी १ ते १५ जानेवारी या कालावधीत सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथा कथन स्पर्धा असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भात शासन निर्णय प्रसिध्द केला आहे. त्यादवारे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाबाबत मार्गदर्शक सुचना आणि कार्यपध्दती देण्यात आली आहे. राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

वाचन पंधरवाडयानिमित्त शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य, कार्यशाळा, पुस्तक परीक्षण आणि कथा कथन स्पर्धा असे उपक्रम आयोजित करण्यास सुचित करण्यात आले आहे. या कालावधीत नजीकच्या कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधून अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करण्याचे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, यांनी केले आहे.

शहाजापुर येथील कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयात १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान विविध उपक्रमांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचे आयोजन केले असून जास्तीत जास्त वाचकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रंथपाल सुरेंद्र शिंदे यांनी केले आहे.

# प्रतिष्ठाणच्या माध्यमातून पवारांचे मोठे योगदान

## खासदार नीलेश लंके यांचे गौरवोद्गार



**निघोज : प्रतिनिधी**

**नीलेश लंके प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष या नात्याने माजी सभापती सुदाम पवार यांनी समाजाच्या विविध घटकांसाठी मोठे योगदान दिले असल्याचे गौरवोद्गार खासदार नीलेश लंके यांनी काढले.**

पवार यांच्या वाढदिवसानिमित्त निघोज-अळकुटी गटाच्या वतीने तसेच निघोज ग्रामस्थांच्या वतीने खा. नीलेश लंके यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, मळगंगा ट्रस्टचे कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, मा. सरपंच ठकाराम लंके, खंडू भुकन, किसनराव रासकर, रूपेश ढवण, जालिंदर झरेकर आदी उपस्थित होते.

खासदार नीलेश लंके यावेळी बोलताना म्हणाले, गेली पंचवीस वर्षे राजकीय क्षेत्रात काम करताना सुदाम पवार यांनी निःस्वार्थपणे काम केले. प्रतिष्ठाणच्या माध्यमातून राज्यभर काम करताना प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात येणारे सामाजिक काम लोकाभिमुख कसे होईल यासाठी त्यांनी परीश्रम केले आहेत. पवार यांच्या कामाची प्रेरणा घेऊन आजच्या युवकांनी काम करण्याची गरज असल्याचे खा. लंके म्हणाले.

मा. सरपंच ठकाराम लंके म्हणाले, मा. सभापती सुदाम पवार यांनी लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर सामाजिक कामे करून प्रतिष्ठानची व्याप्ती वाढविली आहे. पवार यांच्यापासून प्रेरणा घेऊन प्रतिष्ठाणच्या पदाधिकाऱ्यांनी काम करण्याची गरज असून युवकांनी सामाजिक कामांना न्याय देण्याची गरज असल्याचे लंके म्हणाले.

### लंके यांचे नेतृत्व हे माझे भाग्य

**खासदार लोकनेते नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची मला संधी लाभली हे मी माझे भाग्य समजतो. कुकडी पाण्याच्या आवर्तनामध्ये पारनेर तालुक्याला जास्तीत जास्त कसा न्याय मिळेल यासाठी खा. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली आपण काम केले. यापुढील काळातही लोकाभिमुख काम करण्यासाठी आपण कटीबध्द आहोत.**

# कराचा भरणा करा अन्यथा कारवाईला सामोरे जा!

## पारनेर नगरपंचायतीचा निर्वाणीचा इशारा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर नगरपंचायतीच्या हद्दीतील मालमत्ता धारकांकडे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाअखेर मालमत्ता व पाणी पट्टी कराची थकबाकी आहे अशा मालमत्ताधारकांनी कराची रक्कम त्वरीत जमा करावी अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा नगरपंचायतचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी दिला आहे.**




पारनेर नगरपंचायतीच्या वतीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या वसुलीसाठी मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष वसुली मोहिम सुरू करण्यात आली आहे. कार्यालय अधिक्षक माधव गाजरे, कर निरिक्षक श्रीमती सायली ढुमे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथकामध्ये नेमणूक करण्यात आली आहे.

जे थकबाकीदार मालमत्ता व पाणी पट्टी कराचा भरणा करणार नाहीत, अशा थकबाकीदारांवर मालमत्ता जप्ती, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिध्द करणे यांसह कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे. कर भरण्यासाठी नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी शनिवारी व रविवारी सुटीच्या दिवशी देखील नगरपंचायतीचा वसुली विभाग सुरू राहणार आहे.

थकबाकीदारांनी आपल्या मालमत्ता व पाणी पट्टी काराचा भरणा करून होणारी संभाव्य कारवाई टाळावी व नगरपंचायत प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी केले आहे. दरम्यान, मुख्याधिकाऱ्यांच्या इशाऱ्यामुळे पारनेर नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता थकबाकीदरांचे धाबे दणाणले असून कर जमा करण्यासाठी मालमत्ताधारकांची लगबग सुरू झाली आहे.

# पारनेर तालुका रहिवासी मंडळाचे कार्य कौतुकास्पद - शिवाजीराव डेरे

**निघोज : प्रतिनिधी**

**मुंबईतील पारनेर तालुका रहिवासी मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत रेशीमगाठीच्या माध्यमातून लग्न जमविणे, बेरोजगारांसाठी रोजगार मेळावे यांसारखे उपक्रम समाजाभिमुख असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव डेरे यांनी केले.**



निघोज येथील मळगंगा मंदिरासमोरील प्रांगणात पारनेर तालुका रहिवासी मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशक बाबासाहेब कवाद निघोज नागरी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, संदीप पाटील जनसेवा फाउंडेशनचे सचिन वराळ पाटील, मळगंगा ट्रस्टचे शंकरराव लामखडे, सोसायटी वसंत ढवण, उमेश सोनवणे, सचिन वरखडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी दादाभाऊ चौधरी, महादेव वराळ यांनी दिनदर्शिकेची माहिती दिली. ते म्हणाले, मंडळाच्या वतीने तालुक्यातील रहिवासी बांधवांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. गेल्या चार वर्षांपासून विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्या माध्यमातून शेकडो युवक, युवतांचे विवाह जुळविण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

तालुक्यातील विविध गावांमध्ये उपक्रम राबविण्यात येणार असून पारनेर,सुपा, निघोज येथे लवकरच बेरोजगारांचा मेळावा घेऊन मुंबई, पुणे, औरंगाबाद येथील प्रमुख कंपन्यांचे अधिकारी तसेच उद्योजक यांना या मेळाव्यासाठी आमंत्रीत करण्यात येणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वाधिक सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार कसा उपलब्ध होईल यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. मळगंगा ग्रामिण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष वसंत कवाद यांनी रहिवासी मंडळाच्या कार्याचे कौतुक करत मंडळाच्या सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य करण्याचा शब्द दिला.

यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्कर कवाद, सागर आतकर, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग, प्राचार्य रामचंद्र महाराज सुपेकर आदी उपस्थित होते.

# शेतरस्ता समित्या स्थापून अहवाल सादर करा

## गटविकास अधिकारी दयानंद पवार यांचे आवाहन

**पारनेर : प्रतिनिधी**

**ग्राम शेतरस्ते खुले करण्यासाठी ग्रामस्तरीय समिती गठीत करून या समितीचा अहवाल पंचायत समिती कार्यालयास सादर करण्याचे आवाहन गटविकास अधिकारी दयानंद पवार यांनी केले आहे.**

शिवपानंद शेत रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांच्या नेतृत्वाखाली ३१ डिसेंबर रोजी पारनेरच्या शासकीय विश्रामगृहावर पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीनंतर गटविकास अधिकारी दयानंद पवार यांना शासन निर्णयाचे स्मरण पत्र देण्यात आल्यानंतर पवार यांनी त्याची तात्काळ दखल घेत ग्राम शेत रस्ते खुले करण्यासाठी ग्रामस्तरीय समिती गठीत करून समितीचा अहवाल २६ जानेवारीपर्यंत कार्यालयाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. दरम्यान, शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल तालुक्यातील शेतकऱ्यांकडून गटविकास अधिकारी दयानंद पवार यांचे कौतुक करण्यात येत आहे.

सेनापती बापट, अण्णा हजारे यांच्या या तालुक्याने शेतपानंद रस्त्यांसाठी राज्याला दिशादर्शक राज्यव्यापी चळवळ उभी केली असून या प्रश्नावर राज्यात मोठे काम उभे राहिले आहे. राज्याच्या अनेक भागांत यशस्वी आंदोलने होत असताना त्या शेतकरीही सहभागी होत आहेत. चळवळीच्या माध्यमातून अनेक शेत रस्ते खुले होत असून या चळवळीला औरंगाबाद खंडपीठाने बळकटी देत अर्ज सादर केल्यानंतर साठ दिवसांत शेत रस्ता मुखल करून हद्द निश्चित करून देण्याचे आदेश दिले आहेत.

यावेळी सचिन शेळके, भाऊसाहेब वाळुंज, दशरथ वाळुंज, संजय साबळे, बबन गुंड, हनुमंत शेटे, सुभाष शेळके, बाबाजी घोगरे, बापूसाहेब जंगले, पंढरीनाथ काळखे, स्वप्निल गट, लक्ष्मण वाढवणे, रघुनाथ वाढवणे, मयुर वाढवणे, किसन झंजाड, अविनाश वाढवणे, मारूती वाळुंज, बाबा पठाण आदी उपस्थित होते.



शिवपानंद शेत रस्ते खुले करण्यासंदर्भात शिवपानंद शेतरस्ते चळवळीच्या वतीने गटविकास अधिकारी दयानंद पवार यांना निवेदन देण्यात आले.

### ग्रामपंचायतीला पुरस्कार

**महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेत रस्ता चळवळीच्या वतीने राज्यभर पिढयान पिढया चाललेला संघर्ष थांबविण्यासाठी ब्रिटीशकालीन शिव पानंद शेत रस्त्यांच्या प्रश्नावर जनजागृती, न्यायालयीन लढयाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून या चळवळीला राज्यात मोठे यश येत आहे. जिल्हा प्रशासन या आंदोलनाची दखल घेत आहे. राज्यातील ज्या ग्रामपंचायती गावातील सर्व शिवपानंद रस्ते खुले करतील त्यांना चळवळीच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.**

शरद पवळे, दादासाहेब जंगले

### ग्रामस्तरीय समितीचे स्वरूप

**सरपंच पदसिध्द अध्यक्ष, मंडलाधिकारी, तंटामुक्त अध्यक्ष, सेवा संस्थेचे चेअरमन, प्रगतीशील शेतकरी, महिला ग्रामपंचायत सदस्य, कृषि सहाययक, बीट जमादार, पोलीस पाटील, तलाठी.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com